
सातारा
२८ रविवार जून २०२६
वर्ष २९ वे | पृष्ठ : ८ | अंक ३०९
Web site : www.emuktagiri.in
₹६
PRGI Regd No. 69769/98

दैनिक
# मुक्तागिरी
थेट संवाद आपल्याशी...!

# कागद नाही, विद्यार्थ्यांची स्वप्ने फाटली !

## टीईटीचा पेपर लीक, व्यवस्थेची लक्तरे वेशीवर !

**मुंबई, वृत्तसंस्था, दि.२७:**
राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेला मोठा धक्का बसला आहे. ठाण्यात शिक्षक पात्रता परीक्षा पेपर फुटल्याची धक्कादायक घटना समोर आल्यानंतर उद्या म्हणजेच रविवार २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा तातडीने स्थगित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील सुमारे २ लाख २६ हजार उमेदवारांवर थेट परिणाम झाला असून ऐन परीक्षेच्या आदल्या दिवशी हा निर्णय जाहीर झाल्याने उमेदवारांमध्ये संताप आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### नेमका प्रकार काय?

**प्राथमिक माहितीनुसार, ठाण्यातील एका परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच बाहेर गेल्याची माहिती संबंधित यंत्रणांना मिळाली. त्यानंतर शिक्षण विभाग आणि संबंधित तपास यंत्रणांनी तातडीने हालचाल करत संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू केली. पेपरफुटीची शक्यता लक्षात घेऊन परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**२ लाख २६ हजार शिक्षक देणार होते टीईटीचा पेपर :**
या परीक्षेसाठी राज्यभरातील २.२६ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती. अनेक उमेदवार परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रवासाची आणि निवासाची व्यवस्था करून बसले होते. मात्र, अचानक परीक्षा स्थगित झाल्याने उमेदवारांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.दरम्यान,पेपरफुटीमागील नेमके कारण, त्यामध्ये कोणाचा सहभाग आहे आणि प्रश्नपत्रिका कशा पद्धतीने बाहेर आली, याचा तपास सुरू करण्यात आला आहे. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# डायल ११२ चा धडाका!

## सात मिनिटांत पोलिस घटनास्थळी

**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**सांगली, दि. २७ :**
सांगली पोलिसंनी नागरिकांच्या मदतीसाठी सुरू करण्यात आलेल्या डायल ११२ या आपत्कालीन क्रमांकाचा नागरिकांना मोठा फायदा होत आहे.कॉल आल्यानंतर अवघ्या काही मिनिटांत पोलिस घटनास्थळी पोहोचत आहेत.राज्यातील ताज्या आकडेवारीनुसार, सांगली पोलिसांचा प्रतिसाद कालावधी (रिस्पॉन्स टाईम) हा अवघ्या सात मिनिटांचा आहे. दररोज सरासरी १२५ हून अधिक कॉल येत असून, त्याला तातडीने प्रतिसाद दिला जातो. या कामगिरीत सांगली जिल्हा राज्यात तिसऱ्या ते पाचव्या स्थानावर असल्याची माहिती पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनी दिली.

दोशी म्हणाले,आपत्कालीन सेवेसाठी डायल ११२ हा क्रमांक अत्यंत प्रभावी ठरत आहे. ही पूर्णतः ऑनलाइन यंत्रणा असून याचे थेट ट्रॅकिंग केले जाते. नागरिकांचा कॉल आल्यानंतर तो मुख्य कॉल सेंटरला जातो, तिथे १ मिनिट ३३ सेकंद लागतात. तेथून तो स्थानिक नियंत्रण कक्षाला आणि पुढे संबंधित भागातील पोलिस गाडीला जोडला जातो. कॉल मिळाल्यापासून सात मिनिटांच्या आत पोलिस गाडी घटनास्थळावर पोहोचते. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सांगली पोलिसांची पोहोचण्याची वेळ खूपच कमी आहे. याच तत्परतेमुळे सांगली जिल्हा राज्यात पाचव्या क्रमांकावर आहे.

काही दिवसांपूर्वी तो तिसऱ्या क्रमांकावर होता. हा प्रतिसाद कालावधी आणखी कमी करून जिल्हा पहिल्या क्रमांकावर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. या कक्षासाठी कर्मचारी संख्याही वाढवण्यात आली आहे. या गतिमान यंत्रणेमुळे काही गंभीर गुन्हे रोखण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. कॉल आल्यानंतर अवघ्या काही मिनिटांत पोलिस घटनास्थळी पोहोचत आहेत.

# मायणीत बेकायदेशीर स्फोटकांचा साठा जप्त

## १७.०९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत,स्था.गुन्हे शाखा व वडूज पोलिसांची संयुक्त कारवाई



**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**रहिमतपूर, दि. २७ :**
स्थानिक गुन्हे शाखा, सातारा आणि वडूज पोलीस स्टेशन यांनी संयुक्त कारवाई करत मायणी (ता. खटाव) येथे बेकायदेशीरपणे स्फोटकांचा साठा व विक्री करणाऱ्या रॅकेटवर धाड टाकून १७ लाख ९ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत विशाल लक्ष्मण जाट (वय ३९, सध्या रा. मायणी, ता. खटाव; मूळ रा. रायपूर, जि. भिलवाडा, राजस्थान), बारुलाल लक्ष्मण जाट (सध्या रा. मायणी, ता. खटाव; मूळ रा. राजस्थान) आणि शंकर बेनीराम चौधरी (रा. मायणी, ता. खटाव मालक व पुरवठादार) यांच्याविरुद्ध वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी विशेष पथक तयार केले होते. विश्वसनीय माहितीच्या आधारे मायणी-विटा मार्गावरील गरवारे वस्ती परिसरात दोन बुलेरो वाहनांमधून जिलेटिन व इतर स्फोटकांची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

छाप्यात दोन बुलेरो वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये सुपर पॉवर १९ एक्स असे नमूद असलेले स्फोटकांचे बॉक्स आढळून आले. त्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथक (बीडीएस) आणि फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. बीडीएसने स्फोटके असल्याची खात्री केल्यानंतर अत्यंत सुरक्षित पद्धतीने स्फोटके जप्त करण्यात आली.

कारवाईत १,८०० जिलेटिन कांड्या (९ बॉक्स), इलेक्ट्रिक, नॉन-इलेक्ट्रिक व ऑर्डिनरी डेटोनेटर्स, सेफ्टी फ्युज, दोन बुलेरो वाहने आणि टाटा कंपनीचा बंदिस्त टेम्पो असा एकूण १७,०९,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेला साठा सुरक्षिततेच्या कारणास्तव परवानाधारक मॅगझिनमध्ये ठेवण्यात आला आहे.

या प्रकरणी स्फोटक पदार्थ अधिनियम, १८८४ मधील कलम ९(ब), स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ मधील कलम ५ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २८८ अन्वये वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पोलीस हवालदार अजित करणे, प्रवीण पवार, स्वप्निल दौंड, अमित सपकाळ तसेच वडूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, पोलीस अधिकारी शिंदे, पोलीस हवालदार चव्हाण, काळे व महिला पोलीस अंमलदार चव्हाण यांनी केली. या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर यांनी पथकाचे अभिनंदन केले.

## थोडक्यात

### दारू, मारहाण आणि प्रेमसंबंधांचा रक्तरंजित शेवट

**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**सांगली, दि. २७ :**
पतीकडून सतत दारूच्या नशेत होणारी मारहाण आणि शिवीगाळीला कंटाळून, पत्नीने आपल्या २३ वर्षीय प्रियकराच्या मदतीने पतीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आनंद हणमंत सर्जे (वय २८, रा. पोळ मळा, १०० फुटी रोड, सांगली) असे मृत पतीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित पत्नी आणि तिच्या प्रियकराला तातडीने ताब्यात घेतले असून, शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

आनंद सर्जे यांचा प्रेमविवाह झाला होता. त्यांना दोन मुले आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या पती-पत्नीमध्ये सतत वाद होत होते. गुरुवारी पहाटे त्यांच्यात पुन्हा किरकोळ कारणावरून भांडण झाले. पतीच्या रोजच्या त्रासाला कंटाळलेल्या पत्नीने अखेर टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवून प्रियकराला घरी बोलावून घेतले. प्रियकर घरी आल्यानंतर दोघांनी मिळून आनंद सर्जे यांना गाठले. सुरुवातीला एका ओढणीच्या साहाय्याने हणमंत यांचे पाय घट्ट बांधले. त्यानंतर पत्नी आणि तिच्या प्रियकराने आनंद यांच्या छातीवर बसून त्यांचा गळा आवळून जीव घेतला. त्यानंतर त्यांचा झोपेतच मृत्यू झाल्याचा कांगावा करीत, हा मृत्यू नैसर्गिक दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यांना पहाटेच रुग्णालयात नेण्यात आले. यावेळी आनंद यांच्या गळ्यावर ओरखडे आढळून आले. उत्तरीय तपासणीत त्यांचा घातपात झाल्याचे स्पष्ट झाले.दरम्यान, पोलिसांनी पत्नीकडे चौकशी केली असता ती गडबडली. तिच्या चेहऱ्यावरील भीती आणि बदललेली वर्तणूक पाहून पोलिसांना संशय आला. तिची कसून चौकशी असता तिने प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केल्याची कबुली दिली.

## बोलक्या रेषा




# सतर्क पोलिसांमुळे बालविवाह हाणून पाडला

## रहिमतपूरमध्ये १५ वर्षीय मुलीला मिळाले कायद्याचे संरक्षण

**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**रहिमतपूर, दि. २७ :**
**रहिमतपूर पोलिसांच्या तत्परतेमुळे अल्पवयीन मुलीचा बालविवाह वेळेत रोखण्यात आला. महिला व बालविकास विभागाच्या समन्वयातून करण्यात आलेल्या या कारवाईमुळे १५ वर्षे ३ महिने वयाच्या मुलीला कायदेशीर संरक्षण मिळाले असून तिचे शिक्षण आणि पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**

रहिमतपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक विनोद नेवसे यांना २६ जून रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रातील एका गावाबाहेरील मंदिरात अल्पवयीन मुलीचा विवाह होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तातडीने पथकासह मंदिरात धाव घेतली. त्या वेळी विवाहाची तयारी अंतिम टप्प्यात होती आणि २५ ते ३० नातेवाईक उपस्थित होते.

पोलिसांनी विवाहाची प्रक्रिया थांबवून मुलीच्या वयाची कागदपत्रे तपासली. त्यामध्ये संबंधित मुलगी विवाहासाठी आवश्यक असलेल्या १८ वर्षांच्या कायदेशीर वयोमर्यादेपेक्षा कमी वयाची असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर कोरेगाव येथील बाल विकास प्रकल्प अधिकारी शारदा जाधव तसेच ग्रामविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्यात आली.

महिला पोलिसांच्या मदतीने मुलीला सुरक्षित ताब्यात घेऊन तिच्या नातेवाईकांसह पोलीस ठाण्यात आणण्यात आले. महिला व बालविकास विभागाच्या अहवालानंतर तिला सातारा जिल्हा बाल कल्याण समिती (सीडब्ल्यूसी) समोर हजर करण्यात आले.

बाल कल्याण समितीने संबंधित मुलीला काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालिका घोषित करत सुरक्षित निवाऱ्यात ठेवण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर तिच्या समुपदेशन, शिक्षण आणि पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अंतर्गत १८ वर्षांखालील मुलीचा विवाह करणे किंवा त्यासाठी मदत अथवा प्रोत्साहन देणे हा गंभीर आणि अजामीनपात्र गुन्हा असल्याचे पुन्हा स्पष्ट केले आहे. बालविवाहाची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीस किंवा चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही रहिमतपूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक विनोद नेवसे, पोलीस उपनिरीक्षक गंगाप्रसाद केंद्रे, पोलीस हवालदार प्रवीण बर्गे, शंकर घाडगे, महेश शेडगे, सुशांत शिंदे, महिला पोलीस हवालदार शितल सानप, पोलीस कॉन्स्टेबल समाधान देशमुख, संजय सपकाळ, तुषार काळंगे, महिला पोलीस कॉन्स्टेबल अश्विनी घाडगे शुभांगी पाटोळे, अर्पिता गायकवाड यांच्यासह बाल विकास प्रकल्प अधिकारी शारदा जाधव यांनी केली आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री तेरणी यांनी संबंधित पथकाचे अभिनंदन केले.

# अवैध लाकूड वाहतुकीवर वनविभागाचा छापा

## ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त; वन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल

**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**कराड, दि. २७ :**
कराड वनपरिक्षेत्रातील मसूरमध्ये सुरु असलेल्या अवैध लाकूड वाहतुकीविरोधात वनविभागाच्यावतीने नुकतीच धडक कारवाई करत ट्रॅक्टर व ट्रॉलीसह लाकडाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहनमालक व चालकाविरुद्ध भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

रसिक धनजीभाई पटेल (वाहनमालक व चालक) असे वन गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत वन विभागाकडून मिळालेली माहिती अशी की, वन विभागाला दि. २० जून रोजी मसूर परिसरातून लिंब, करंज, जांभूळ आणि सुबाभूळ या प्रजातींच्या नगवड लाकडाची बेकायदा वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार वनपाल सुहास भोसले आणि वनरक्षक शीतल पाटील यांनी घटनास्थळी जाऊन तपासणी केली. त्यावेळी ट्रॅक्टर (एमएच-५० एएल-६३६५) व ट्रॉली (एमएच-११ बीए-८०४२) मधून लाकडाची अवैध वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आले.



कराड वनपरिक्षेत्रातील मसूरमध्ये अवैध लाकूड वाहतुकीविरोधात वनविभागाच्यावतीने नुकतीच धडक कारवाई करत ट्रॅक्टर व ट्रॉलीसह लाकडाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी वाहनमालक व चालक रसिक धनजीभाई पटेल यांच्याविरुद्ध भारतीय वन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच ट्रॅक्टर, ट्रॉली आणि लाकडाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या गुन्ह्यात दोषी आढळल्यास एक वर्षापर्यंत कारावास किंवा पाच हजार रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे.

दरम्यान, वनविभागाने नागरिकांना अवैध लाकूड वाहतूक, राखीव वनक्षेत्रातील अतिक्रमण, वन्यप्राण्यांची शिकार, तसेच वनवा लावणे हे कायद्याने दंडनीय गुन्हे असल्याची आठवण करून देत अशा प्रकारांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक अमोल सातपुते आणि सहाय्यक वनसंरक्षक जयश्री जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी ललिता पाटील, वनपाल सुहास भोसले आणि वनरक्षक शीतल पाटील यांनी केली. रसिक धनजीभाई पटेल (वाहनमालक व चालक) असे वन गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास वनपाल सुहास भोसले करत आहेत.

# दहिवडीत वनविभागाची धडक कारवाई

## विरळीतून अवैध लाकूड वाहतूक करणारा ट्रक जप्त, दोघांवर गुन्हा दाखल

**राखीव जंगलांची लूट आणि वनसंपत्तीची तस्करी करणाऱ्यांवर वनविभागाने पुन्हा एकदा जोरदार प्रहार केला असून, दहिवडी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या मौजे विरळी येथून पिंपर्णी प्रजातीच्या जळावू लाकडाची बेकायदेशीर वाहतूक करणारा ट्रक वनविभागाच्या पथकाने रंगेहात पकडला आहे. मिळालेल्या अत्यंत गुप्त माहितीच्या आधारे वनपाल कुकुडवाड आणि वनरक्षक जांभुळणी यांनी २६ जून रोजी विरळी परिसरात सापळा रचला होता.**

**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**दहिवडी,दि.२७:**
संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून असलेल्या पथकाने MH-११-AL-४९१० क्रमांकाच्या ट्रकला थांबवून चौकशी केली असता, या ट्रकमध्ये कोणतीही वैध परवानगी नसलेला पिंपर्णी प्रजातीचा जळावू लाकूड माल आढळून आला.



कारवाई करण्यात आलेले वाहन (छाया : प्रविण राजे )

याप्रकरणी वनरक्षक जांभुळणी यांच्या कडील प्रथम गुन्हा रिपोर्ट क्रमांक ०१/२०२६ अन्वये गाडी मालक सागर हिंदुराव गंबरे आणि चालक केशव तुकाराम खाडे यांच्यावर भारतीय वन अधिनियम १९२७ च्या नियमानुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून, या गुन्ह्यासाठी एक वर्षापर्यंत कारावास किंवा पाच हजार रुपये दंड, अथवा दोन्ही शिक्षांची तरतूद असल्याने वनविभागाने लाकडासह ट्रक जप्त केला आहे.

या धडक कारवाईनंतर दहिवडी वनपरिक्षेत्र कार्यालयाने परिसरातील नागरिकांना आणि लाकूड तस्करांना कडक शब्दांत इशारा दिला असून, अवैध लाकूड वाहतूक करणे, राखीव वनक्षेत्रात अतिक्रमण करणे, वन्यप्राण्यांची शिकार करणे किंवा जंगलाला वणवा लावणे हे गंभीर कायदेशीर गुन्हे असल्याचे स्पष्ट केले आहे; यात सहभागी असणाऱ्यांची गय केली जाणार नाही आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल असा सज्जड दमही वनविभागाने दिला आहे. ही संपूर्ण कारवाई सातारा वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते व सहाय्यक वनसंरक्षक श्री दिगंबर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत नेटके नियोजन करून पार पाडण्यात आली.

सदर यशस्वी कामगिरीमध्ये दहिवडी प्रादेशिकचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमित मुळीक, कुकुडवाडचे वनपाल जावेद मुल्ला आणि जांभुळणीच्या वनरक्षक पर्वती सरगर यांच्या पथकाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली असून, त्यांच्या या तत्परतेमुळे वनतस्करांचे मोठे मनसुबे उधळून लावले गेले आहेत. याप्रकरणी पुढील तपास कुकुडवाडचे वनपाल जावेद मुल्ला हे करत असून, विरळी परिसरातील या अवैध लाकूड तस्करीच्या रॅकेटमध्ये आणखी कोणाकोणाचा हात आहे आणि याचे धागेदोरे कुठपर्यंत पसरले आहेत, याचा सखोल शोध आता वनविभागाकडून घेतला जात आहे.

# रहिमतपूर ते मसूर रस्त्याला २८५ कोटींची मंजुरी

## आ.मनोजदादा घोरपडे यांच्या पाठपुराव्याला यश



**मुक्तागिरी वृत्तसेवा**
**मसूर, दि. २७ :**
कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या रहिमतपूर ते कराड या ४२ किलोमीटरच्या रस्त्यासाठी तब्बल २८५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीमागे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर येथून सुरू होणारा हा मार्ग सुर्ली वाठार, साठेवाडी फाटा तसेच कराड तालुक्यातील पाडळी, बानुगडेवाडी, हेळगाव, कचरेवाडी, खराडे फाटा, मसूर, शहापूर, यशवंतनगर आणि कोपर्डे हवेली या गावांना जोडणारा प्रमुख दळणवळण मार्ग आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याची दुरवस्था नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत होती. खड्डेमय रस्ते, वाहतुकीतील अडथळे, शेतमाल वाहतुकीतील अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासातील गैरसोयी यामुळे या मार्गाच्या उन्नतीची मागणी सातत्याने होत होती.पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यातील चौथ्या दिवशी पुरवणी मागण्यांमध्ये या कामाला अंतिम स्वरूप मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून या रस्त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांचा माल अधिक वेगाने बाजारपेठेत पोहोचणार असून विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित होणार आहे. तसेच व्यापार, उद्योग आणि रोजगाराच्या संधींनाही चालना मिळणार आहे.

> **रस्ता विकासासाठी मंजूर झालेल्या या निधीमुळे कोरेगाव व कराड तालुक्यातील गावांच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून दळणवळण अधिक वेगवान होणार आहे. औद्योगिक विकास, व्यापार आणि रोजगाराला चालना मिळणार असल्याने मसूर पूर्व भागातील नागरिकांनी आमदार मनोजदादा घोरपडे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.**
>
> **- पुरंदर जाधव,**
> **सरचिटणीस, भाजपा कराड उत्तर**

आमदार झाल्यापासून अल्पावधीत अनेक ऐतिहासिक व वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली विकासकामे मार्गी लावण्यात आमदार मनोजदादा घोरपडे यांना यश आले आहे. त्यामुळे कराड उत्तरच्या विकासासाठी जनतेला खऱ्या अर्थाने कैवारी नेतृत्व लाभल्याची भावना व्यक्त होत आहे.

## संपादकीय ...

### राज्याचे आरोग्य सुधारणार!

बेरोजगार वर्ग विविध नौकरीच्या शोधात असतात. त्यातही शासकीय नौकरीस त्यांचे सर्वोच्च प्राधान्य असते हे लपून नाही. मात्र, त्या सेवेत जाण्यासाठी जोमदार तयारी मात्र हवी. तयारी झाली की जाहिरातची वाट बघणे आलेच. ही संधी आता आरोग्य खात्याकडून आली आहे.

सरकारी नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागात लवकरच तब्बल ५ हजार २२३ नवीन पदांची भरती केली जाणार आहे. या संदर्भातील अधिकृत पदनिर्मितीचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध करण्यात आला असून, यामुळे आरोग्य यंत्रणेला बळकटी मिळण्यासोबतच हजारो तरुणांना रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

आरोग्य यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी हे पाऊल असल्याचे म्हटल्या जाते. राज्यातील शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि जिल्हा रुग्णालयांवर कामाचा मोठा ताण पडत आहे. अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांची आणि तज्ज्ञांची पदे रिक्त असल्याने सर्वसामान्यांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर, राज्यातील आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि ग्रामीण तसेच शहरी भागातील जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या नवीन ५ हजार २२३ पदांच्या निर्मितीमुळे आरोग्य विभागाचा कणा अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

प्रसिद्ध झालेल्या शासन निर्णयानुसार, या मेगाभरतीमध्ये आरोग्य विभागातील वेगवेगळ्या श्रेणीतील आणि संवर्गातील पदांचा समावेश असेल. यामध्ये वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका (स्टाफ नर्स), प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी (फार्मसिस्ट) तसेच इतर तांत्रिक व अतांत्रिक प्रशासकीय पदांचा प्रामुख्याने समावेश आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून ते जिल्हास्तरीय रुग्णालयांपर्यंत आवश्यकतेनुसार या जागांचे वाटप केले जाणार आहे. पदनिर्मितीचा शासन निर्णय जारी झाल्यामुळे आता लवकरच या सर्व जागांसाठीची अधिकृत जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने राबवण्याचे नियोजन प्रशासनाकडून केले जात आहे. इच्छुक उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावे लागतील. आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि निकषांची सविस्तर माहिती आगामी जाहिरातीमध्ये स्पष्ट केली जाईल.

## मार्डी : २० वर्षांपासूनचा जमीन व कौटुंबिक वाद सामोपचाराने मिटला; गावासमोर सलोख्याचा आदर्श

### वाद नव्हे, संवाद हवा; तंटा नव्हे, सलोखा हवा! हा संदेश या सामोपचारातून पुन्हा अधोरेखित

मुक्तागिरी वृत्तसेवा

**मार्डी, दि. २७ :** मार्डी येथील सख्खे चुलत भाऊ श्री. सलीमभाई मुलाणी, श्री. नजीरभाई मुलाणी व श्री. पिरखान मुलाणी यांच्यामध्ये वडिलोपार्जित जमिनीच्या वाटपावरून गेल्या सुमारे २० वर्षांपासून सुरू असलेला जमीन व कौटुंबिक वाद अखेर सामोपचाराने मिटला. पोलीस पाटील आप्पासो गायकवाड व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मोहन हांगे यांच्या संयमी मध्यस्थीमुळे दोन्ही बाजूंमध्ये यशस्वी समेट झाला.

वडिलोपार्जित मालमत्तेच्या वाटपावरून संबंधित कुटुंबांमध्ये अनेक वर्षांपासून न्यायालयीन वाद सुरू होते. तसेच काही जमिनी संयुक्त मालकीच्या असल्याने त्यावरूनही वारंवार मतभेद निर्माण होत होते. या वादातून अनेक वेळा एकमेकांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रारी व गुन्हे दाखल करण्याची वेळही आली होती. त्यामुळे दोन्ही कुटुंबांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पाटील आप्पासो गायकवाड व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मोहन हांगे यांनी दोन्ही पक्षांशी संयमाने संवाद साधत परस्पर समजूत काढली. अनेक बैठका आणि चर्चेनंतर दोन्ही बाजूंनी सलोख्याचा मार्ग स्वीकारत दीर्घकाळ चालत आलेल्या वादावर पडदा टाकला.



या सामोपचारामुळे केवळ दोन कुटुंबांतील वाद संपला नसून, संवाद, संयम आणि परस्पर विश्वास यांच्या माध्यमातून कितीही जुने मतभेद मिटवता येतात, याचा आदर्श गावासमोर निर्माण झाला आहे.

मार्डीसह परिसरातील नागरिकांनी जमीन, कौटुंबिक किंवा इतर कोणतेही वाद वर्षानुवर्षे न्यायालयात न ठेवता शक्य तेथे सामोपचाराने सोडविण्याचा प्रयत्न करावा. गावात सलोखा, ऐक्य आणि बंधुभाव जपणे हीच समाजाच्या प्रगतीची खरी दिशा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## वीज वितरण कार्यालयासमोर रिपाईचा अर्ध नग्न आंदोलनाचा इशारा

### वीज जोडणी टेंडर प्रक्रियेतील भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी

मुक्तागिरी वृत्तसेवा

**सातारा, दि. २७ :** सातारा महावितरण विभागामध्ये वीज जोडणे टेंडर प्रक्रियेत प्रचंड भ्रष्टाचार असून दलाली आणि पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे दादासाहेब ओव्हाळ व जिल्हाध्यक्ष सोमनाथ धोत्रे यांनी केली

याप्रकरणी तात्काळ न्याय न मिळाल्यास महावितरणच्या कार्यालयासमोर येत्या पंधरा दिवसात अर्ध नग्न आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे .हा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला यावेळी कार्यकारिणीचे सदस्य पूनम निकाळजे दामिनी निंबाळकर मदन कंकाळ प्रदीप नलावडे रामभाऊ मदाडे राजेंद्र भटकर शाहरुख शेख महेश पवार विकास जाधव अभिजीत शिंदे सुरज गाडे वंदना सगळे व शितल बल्लाळ उपस्थित होते .

महावितरणच्या कारभाराचा पंचनामा करताना दादासाहेब ओवाळ म्हणाले महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या तीन वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन बदला होत नाहीत शासनाच्या एनएससी फंडातून कामे होत असताना कार्यकारी अभियंता मंजुरीसाठी अंदाजपत्रकाच्या ५०% रक्कम मागितली जाते व नकार दिल्यास निविदेला मंजुरी दिली जात नाही .मर्जीतल्या ठेकेदारांनाच टेंडर दिले जाते लोकप्रतिनिधीचे नाव सांगून कर्मचाऱ्यांना चुकीचे काम करण्यास दबाव आणला जातो .

निलेश पवार या खातेदाराने महावितरण कडे १०० केवीचा डीपी मागितला असता त्याचा डीपी दुसरीकडे हस्तांतरित करण्यात आला तसेच शंभर केवीच्या डीपीची मागणी केली असता ६० केबी चा डीपी खातेदाराला दिला जातो असे अक्षम्य प्रकार या खात्यामध्ये सुरू आहेत साताऱ्यात बऱ्याच ठिकाणी दलित वस्ती नसताना तेथे मंजूर करण्यात येऊन त्याची कामे करण्यात आलेली आहेत .या सर्व गैरप्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी अन्यथा पंधरा दिवसात महावितरण कार्यासमोर अर्ध नग्न आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## क्राईम रिपोर्ट



फलटण : मुद्देमालासह पोलीस अधिकारी व कर्मचारी

### फलटण ग्रामीण पोलिसांची गांजा लागवडीवर कारवाई; ७ किलो १४३ ग्रॅम गांजाची झाडे जप्त

**फलटण, दि. २७ :** फलटण ग्रामीण पोलिसांनी गुणवरे ता. फलटण येथे अमली पदार्थांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत गांजा लागवडीवर यशस्वी कारवाई करत ३४ हजार ६५० रुपये किंमतीची ७ किलो १४३ ग्रॅम वजनाची गांजाची झाडे जप्त केली. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंकुश रामचंद्र कोळेकर रा. गुणवरे, ता. फलटण असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

याबाबत फलटण ग्रामीण पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, गुणवरे, ता. फलटण, जि. सातारा येथे एका घराच्या बाजूला गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दि. २५ जून रोजी तेथील घुलेवस्ती येथे छापा टाकला असता तेथे त्यांना ३४ हजार ६५० रुपये किंमतीची ७ किलो १४३ ग्रॅम वजनाची गांजाची झाडे मिळून आली. या कारवाई वरुन अंकुश कोळेकर याच्यावर फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधिक्षक वैशाली कडुकर, पोलीस उपअधीक्षक धन्यकुमार गोडसे, पोलीस निरीक्षक राजकुमार भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत सुबनावळ, पोलीस उपनिरीक्षक शिवानी नागवडे व पोलीस संतोष मठपती, पोलीस हवालदार शांतीलाल ओंबासे, योगेश रणपिसे, पोलीस नाईक सागर अभंग, कॉनस्टेबल तुषार नलवडे, अमोल देशमुख, अविनाश शिंदे यांनी ही कारवाई केली.

### खिंडवाडीतील खाणीत अवैध स्फोटकांचा साठा उघड

**सातारा, दि. २७ :** सातारा तालुक्यातील खिंडवाडी येथील दगड खाण परिसरात बेकायदेशीररीत्या साठवून ठेवलेल्या स्फोटकांच्या मोठ्या साठ्यावर सातारा शहर पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत सुमारे १ लाख ५५ हजार रुपयांचा स्फोटक साहित्याचा साठा जप्त करण्यात आला असून, राजस्थानातील एका संशयिताला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी आणखी दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांना खिंडवाडी येथील खाण परिसरातील कंटेनरमध्ये अवैध स्फोटके लपवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार उपनिरीक्षक सुधीर मोरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी छापा टाकला. तेथे कुलूपबंद कंटेनरची पाहणी केली असता आत मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य असल्याचे स्पष्ट झाले.पोलिसांनी परिसराची सुरक्षा व्यवस्था करून तेथे उपस्थित असलेल्या शिवराज बलदेव चौधरी (रा. जोधपूर, राजस्थान) याला ताब्यात घेतले. त्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने कंटेनरमधून २,४२३ जिलेटीन कांड्या, १,८९० डिटोनेटर, ४८० किलो नायट्रेट पावडर तसेच इतर स्फोटके सुरक्षितपणे जप्त केली. पुढील धोका टाळण्यासाठी हा साठा सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आला. बेकायदेशीररीत्या स्फोटकांचा साठा करून सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण केल्याप्रकरणी शिवराज बलदेव चौधरी व त्याच्या दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध सातारा शहर पोलिस ठाण्यात स्फोटक पदार्थ अधिनियमासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपनिरीक्षक सुधीर मोरे करीत आहेत.

### कत्तलीसाठी नेले जात असलेले गाईचे वासरू सुरक्षित, ओम्नीसह मुद्देमाल जप्त

**सातारा, दि. २७ :** मोहरम बंदोबस्तादरम्यान गस्त घालत असलेल्या सातारा शहर पोलिसांनी गुरुवार पेठ परिसरात कारवाई करून कत्तलीसाठी अवैधरित्या नेले जात असल्याचा संशय असलेले गाईचे वासरू ताब्यात घेतले. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा आणि महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ओम्नी कारही जप्त करण्यात आली आहे.

पोलीस शिपाई संतोष घाडगे, पोलीस उपनिरीक्षक व्ही. एन. राठोड व त्यांच्या पथकाला हितेन विजय केंडे आणि हर्षद दिलीप सुतार यांनी गुरुवार पेठ येथील इकबाल आदम शेख (वय ४५) हा ओम्नी कारमधून गाईचे वासरू आणत असल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी संबंधिताच्या घराजवळ सापळा रचला.दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास एमएच-१२ एफपी-५३०३ क्रमांकाची ओम्नी कार तेथे आल्यानंतर चालक वासरू घरात नेत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत जनावराच्या वाहतुकीसाठी किंवा कत्तलीसाठी आवश्यक असलेले कोणतेही वैध कागदपत्र अथवा परवाना त्याच्याकडे नसल्याचे समोर आले. तसेच वासरू कोठून आणले याबाबतही तो समाधानकारक माहिती देऊ शकला नाही.पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता जनावराच्या वाहतुकीसाठी आवश्यक चारा, पाणी व पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे आढळले. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली असता सुमारे चार महिन्यांचे एच.एफ. क्रॉस जातीचे नर वासरू अशक्त असल्याचे निष्पन्न झाले.

## अकराव्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत कौशिकी आंधळकरचे यश

मुक्तागिरी वृत्तसेवा




**सातारारोड, दि. २७ :** मास्टर एज्युकेशन अकॅडमी तर्फे पुणे येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे झालेल्या अकराव्या राष्ट्रीय पातळीवरील अबॅकस व वेदिक मॅथ्स स्पर्धेत लेवल जी-वन मध्ये कुमारी कौशिकी नीलकंठ आंधळकर हिने प्रथम क्रमांक मिळविला कौशिकीला तिच्या आयुष अबॅकस सेंटरच्या संचालिका सौ वैशाली जेबले तसेच मास्टर अबॅकस संस्थेचे प्राचार्य श्री शिवराज पाटील सर तसेच प्रियदर्शनी स्कूल कोरेगाव च्या मुख्याध्यापिका डव्होकेट सौ अर्पिता दीक्षित व उपमुख्याध्यापिका अश्विनी मेहेत्रे यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन लाभले. या तिच्या यशाबद्दल सर्व थरातून तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.



तडवळे विकास सेवा सोसायटीचे स्वीकृत संचालक रोशन बागल यांचा सत्कार करताना मान्यवर.

## तडवळे विकास सेवा सोसायटीच्या स्वीकृत संचालक बिनविरोध निवडी

मुक्तागिरी वृत्तसेवा

**वडूज, दि. २७ :** येथील विकास सेवा सोसायटीच्या मासिक सभेत स्वीकृत संचालक पदासाठीची निवड प्रक्रिया संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. सोसायटीचे चेअरमन भरत पाटील आणि व्हाईस चेअरमन शांतीलाल काळे यांच्या उपस्थीतीत झालेल्या या सभेत पंढरीनाथ दादा खाडे, रोशन बागल आणि राजेंद्र हांगे यांची स्वीकृत संचालक म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक विकासराव साबळे, बाळासो खाडे, अमोल साबळे, बाळासो पवार, धनंजय नांगरे जे.के. काळे तसेच

सोसायटीचे संचालक छगन दगडू खाडे पाटील, बाळासो विष्णू साबळे, बाबुराव पळे, सुधीर काकासो साबळे, गौतम साधू मोरे, सौ. गंगुबाई जगन्नाथ खाडे, प्रकाश तुकाराम खाडे, बाबुराव गुलाब पाटोळे, पांडुरंग विठोबा खाडे व नंदकुमार खाडे, सुभाष खाडे, विजय खाडे, सुरेश साबळे, गोरख बागल, बाबुराव साबळे, गणेश बागल, दादा शिंदे आदी संचालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिव शशिकांत पाटील प्रास्ताविक केले.

## दहिवडी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संदीप घार्गे यांची उपायुक्तपदी पदोन्नती

### माण तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव!

मुक्तागिरी वृत्तसेवा



**दहिवडी, दि. २७ :** आपल्या उत्कृष्ट आणि लोकाभिमुख कारभाराने दहिवडी नगरपंचायतीचा चेहरामोहरा बदलणारे धडाडीचे मुख्याधिकारी संदीप घार्गे यांची उपायुक्त पदी पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण माण तालुक्यातून आणि प्रशासकीय वर्तुळातून त्यांचे भरभरून कौतुक होत आहे.

संदीप घार्गे यांनी दहिवडी नगरपंचायतमध्ये मुख्याधिकारी म्हणून आपल्या कार्यकाळाचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. त्यांच्याच कार्यकुशल नेतृत्वाखाली दहिवडी नगरपंचायतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली.

संदीप घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली दहिवडी नगरपंचायतीने नावीन्यपूर्ण योजना आणि कडक प्रशासकीय शिस्त राबवून महाराष्ट्रात आपला एक वेगळा ठसा उमटवला.

संदीप घार्गे यांच्या कल्पकतेमुळे आणि नियोजनामुळे दहिवडी नगरपंचायतीला महाराष्ट्र शासनाचे अनेक प्रतिष्ठीत आणि मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

स्वच्छ भारत अभियान, पाणी पुरवठा सुधारणा, आणि शहरातील पायाभूत सुविधांचा विकास या सर्वच आघाड्यांवर त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. सामान्य नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवण्याला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले, ज्यामुळे ते जनतेमध्ये कमालीचे लोकप्रिय झाले.मुख्याधिकारी पदावरून थेट उपायुक्त पदी पदोन्नती मिळाल्याची बातमी समजताच संपूर्ण माण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या कामाची योग्य दखल शासनाने घेतल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी संदीप घार्गे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला असून, त्यांच्या पुढील वाटचालीस आणि नव्या जबाबदारीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## पिंगळी येथे दोन दिवस धार्मिक कार्यक्रम

**वडूज, दि. २७ :** पिंगळी खुर्द येथे संत शिरोमणी कबीर साहेब मंदिराच्या कलशारोहण सोहळ्यानिमित्त रविवार दि.२८ व सोमवार दि.२९ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दि.२८ रोजी सायंकाळी संत कबीर महाराजांची प्रतिमा व कलशाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री वडूज येथिल संत कबीर भजनी मंडळ व पिंगळी येथिल शेलारवस्तीवरील श्री. हनुमान भजनी मंडळाचे भजन होणार आहे. दि.२९ रोजी सकाळी आठ ते दहा या वेळेत कलश पूजन, दहा ते बारा या वेळेत आनंद आरती, नामदान विधी व होम हवन होणार आहे. दुपारी एक ते दीड या वेळेत देवदरी (अंभेरी) येथिल प.पू.परशुराम वाघ महाराज यांच्या हस्ते कलशारोहण करण्यात येणार आहे. रात्री बालकृष्ण महाराज वसंतगडकर, महंत नवनाथ महाराज यांच्या उपस्थित सत्संग निरुपम सोहळा होणार आहे.

### श्रीराम कारखाना वाचवा, सहकार टिकवा;

## कारखाना बंद ठेवण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही; शेतकरी हिताला बाधा आल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

मुक्तागिरी वृत्तसेवा

**फलटण, दि. २७ :** श्रीराम सहकारी साखर कारखान्याच्या भवितव्याबाबत सुरू असलेल्या घडामोडींवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तीव्र चिंता व्यक्त करत कारखाना वाचवून सहकार चळवळ टिकविण्याची मागणी केली आहे. हा कारखाना कोणत्याही एका राजकीय गटाचा नसून हजारो शेतकरी सभासद, कामगार आणि ऊस उत्पादकांच्या श्रमातून उभा राहिलेला सहकारी कारखाना असल्याचे संघटनेने म्हटले आहे.



प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे की, कारखाना १५ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर दिल्यानंतरही त्याच्यावर मोठे कर्ज शिल्लक असून या परिस्थितीस जबाबदार कोण, याचे उत्तर संबंधितांनी द्यावे. कारखाना बंद पडल्यास शेतकरी, कामगार, ऊसतोड मजूर, वाहतूकदार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल. त्यामुळे आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण थांबवून कारखाना सक्षमपणे चालविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शेतकरी हिताला बाधा पोहोचविणारा अथवा कारखान्याच्या अस्तित्वावर घाला घालणारा कोणताही निर्णय झाल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना तीव्र लोकआंदोलन उभारेल, असा इशाराही प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आला आहे.

या प्रसिद्धीपत्रकावर सातारा जिल्हाध्यक्ष धनंजय महामुलकर, युवक राज्य प्रवक्ते प्रमोद गाडे, फलटण तालुकाध्यक्ष नितीन यादव, जिल्हा सरचिटणीस डॉ. रवींद्र घाडगे, विभागप्रमुख किरण भोसले तसेच किसनराव शिंदे आणि बाळासाहेब शिपुकले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आकर्षक ताझिया, पारंपरिक सजावट आणि धार्मिक देखाव्यांनी कराडला मोहरम उत्साहात

### श्रद्धा आणि धार्मिक वातावरण; मिरवणूक शांततेत; मुस्लिम समाज बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

मुक्तागिरी वृत्तसेवा

**कराड, दि. २७ :** हजरत इमाम हुसेन यांच्या कर्बला येथील सर्वोच्च त्याग आणि शहादतीच्या स्मरणार्थ कराड शहर व परिसरात शुक्रवारी मोहरम अत्यंत श्रद्धा, शिस्त आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. मया हुसेन... या हुसेन...फ च्या घोषणांनी शहर परिसर दुमदुमून गेला, तर पारंपरिक ताझिया मिरवणुकीत हजारो मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मोहरमनिमित्त दर्गा परिसरात धार्मिक विधी, प्रार्थना आणि इमाम हुसेन यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून भव्य ताझिया मिरवणूक काढण्यात आली. विविध मंडळांनी आकर्षक ताझिया, पारंपरिक सजावट आणि धार्मिक देखावे साकारल्याने मिरवणूक विशेष आकर्षण ठरली. मिरवणुकीच्या मार्गावर विविध ठिकाणी रोषणाई व सजावट करण्यात आली होती. तसेच सामाजिक संस्था आणि मुस्लिम समाजाच्या वतीने उभारण्यात आलेल्या मछबीलफ्मधून भाविकांसह नागरिकांना थंड पाणी, शरबत व पिण्याच्या पाण्याचे मोफत वाटप करण्यात आले.

**सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश**

मोहरमच्या निमित्ताने विविध धर्मीय नागरिकांनीही मिरवणुकीत उपस्थित राहून सर्वधर्मसमभाव, सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यामुळे कराडमध्ये सलोखा आणि परस्पर सहकार्याचे प्रेरणादायी चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, मोहरम मिरवणुकीच्या यशस्वी नियोजनासाठी आणि चोख पोलिस बंदोबस्ताबद्दल मुस्लिम समाजाच्या वतीने कराड शहर पोलिसांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

**मोहरम मिरवणूक शांततेत**

मोहरम मिरवणूक शांततेत आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी कराड शहर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड यांनी संपूर्ण मिरवणुकीदरम्यान दक्षता घेतली. त्यामुळे संपूर्ण सोहळा कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत आणि सुरळीतपणे पार पडला.



मोहरम निमित्त कराड शहरातील प्रमुख मार्गांवरून शुक्रवारी भव्य ताझिया मिरवणूक काढण्यात आली यावेळी विविध मंडळांनी आकर्षक ताझिया, पारंपरिक सजावट आणि धार्मिक देखावे साकारल्याने मिरवणूक विशेष आकर्षण ठरली.

दैनिक मुक्तागिरी

" I am changing my name from Shabbir Rasul Shaikh to Shabbir Rasulbhai Shaikh for Passport issuance."
A/P Wathar Station,Tal - Koregaon,Dist - Satara
(P - 2641356)

दैनिक मुक्तागिरी २८/६/२०२६

नावात बदल

MY OLD NAME WAS FAIZA JAINUDDIN NAIKWADE AND MY NEW NAME IS HEENA MOHASIN KAZI

# माणमधील महाबळेश्वरवाडीत उडणार बैलगाडा शर्यतीचा धुरळा..



**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**वरकुटे-मलवडी, दि. २७ :** माण तालुक्यातील महाबळेश्वरवाडी येथे ७ जुलै रोजी युवा नेते श्री.संजय जेडगे यांच्या वाढदिवसानिमित्त बैलगाडा शर्यतीचा थरार रंगणार असून,विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

एक आदत-एक बैल या स्वरूपातील ही शर्यत मंगळवार दि. ७ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वा.सुरू होणार असून,परिसरातील बैलगाडा शौकिनांसाठी ही स्पर्धा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकासाठी सातारा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष श्री.अनिल देसाई ५१ हजार रु.द्वितीय क्रमांकासाठी माण पंचायत समितीचे सभापती श्री.विक्रम शिंगाडे ४१ हजार रु.तृतीय क्रमांकासाठी श्री.पोपटशेट जेडगे केबीआर रिफायनरी राजस्थान ३१ हजार रु.तर चतुर्थ क्रमांकासाठी महाबळेश्वर वाडी सोसायटीचे संचालक माणिक जेडगे २१ हजार रु.पाचव्या क्रमांकासाठी महाबळेश्वरवाडी सोसायटीचे संचालक श्री.भाऊसो पुकळे आणि सिद्धनाथ बुलायन रिफायनरी बेंगलोर श्री.नानासो पुकळे,सहाव्या क्रमांकासाठी ७ हजार रु. रुद्रा आणि मल्हार फॅन क्लब महाबळेश्वरवाडी श्री.भूषण निंबाळकर, सातव्या क्रमांकासाठी ५ हजार रु. बागायतदार श्री दयाराम गाढवे यांच्यातर्फे बक्षिसे लावली असून, क्वार्टर फायनल साठी १५०० रु.ची सात बक्षिसे लावण्यात आली आहेत.क्वॉटर फायनलमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी प्रत्येकी १५०० रु.विजय गाढवे,सागर गाढवे, संतोष जेडगे,बाळासाहेब जेडगे,सचिन जेडगे,अर्जुन निंबाळकर,ऋषिकेश जगताप यांनी बक्षिसांसाठी सौजन्य दिले आहे.तर सर्वोत्कृष्ट गाडी ड्रायव्हरसाठी पैठणी देण्याचे आयोजन केले आहे.तसेच विजेच्या स्पर्धकास ढाल देण्याचे नियोजन आहे.स्पर्धेदरम्यान पाणी टँकर व म्बुलन्स सुविधा देण्यात येणार आहे.स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणी १ जुलै पासून सुरू होऊन ६ जुलै २०२६ पर्यंत असणार आहे.अधिक माहितीसाठी विनोद जेडगे (९३९८२९९३५४), सागर गाडवे (८४१९९२४८५६),प्रभू निंबाळकर (९६९९७२४५६०) आणि विजय गाडवे (८८८८४९७४३५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.. स्पर्धेचे समालोचन सुनील मोरे व भारत गुरव करणार आहेत.अखिल भारतीय बैलगाडा संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या नियमावलीनुसार ही स्पर्धा पार पडणार आहे.मैदान सकाळी ९ वा. सुरू होईल. पंचांचा निर्णय अंतिम राहील.बैलांना मारहाण केल्यास संबंधित गाडी बाद करण्यात येईल. शासनाच्या आदेशानुसार सर्व नियमांचे पालन केले जाईल.सर्व गट सेमीफायनल व फायनल चिठ्ठीद्वारे घेतले जाणार असून,संपूर्ण मैदानाचे स्क्रीन व युट्यूब लाईव्ह प्रक्षेपण करण्यात येणार आहे.या भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन संजयशेठ जेडगे मित्र परिवार यांच्या वतीने करण्यात आले असून, माण तालुक्यासह परिसरातील बैलगाडा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



कराड : छ. शाहू महाराज यांना अभिवादन करताना माजी खा. श्रीनिवास पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, राजेंद्रसिंह यादव व इतर.

# कराडातील राजश्री शाहू महाराजांच्या स्मारकाचे सुशोभिकरण करणार

## राजेंद्रसिह यादव : छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त मान्यवरांकडून अभिवादन

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**कराड, दि. २७ :** कराड येथील छत्रपती शाहू महाराज चौकात असलेल्या राजश्री शाहू महाराज यांच्या स्मारकाचे नूतनीकरण तसेच शहरातील सर्व महापुरूषांच्या पुतळयाची नित्य पुजा केली जाईल, अशी पालिकेतर्फे सोय करणार असल्याचे प्रतिपादन कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी केले.

छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त कराडातील शाहू महाराजांच्या पुतळयास शुक्रवारी विविध मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जयंतकाका पाटील, अल्ताफभाई शिकलगार, नरेंद्र लिबे, निशांत ढेकळे, प्रितम यादव, किर्तीका विभुते, सुलोचना पवार , प्रशांत यादव, लोकप्रतिनिधी व नागरीक उपस्थित होते.

माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील म्हणाले की, राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी महाराष्ट्राला समतेचा, सर्व जाती धर्मांना बरोबर घेवून जाण्याचा व समाजातील सर्व गोरगरीबांना शिक्षण देण्याचे काम केले तोच आदर्श घेवून राज्य व देशाची वाटचाल सुरू आहे.

# वाईत पत्रकारांचा एल्गार; खा.संजय दिना पाटील यांच्याविरोधात पोलीस ठाण्यावर धडक मोर्चा

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**वाई, दि. २७ :** खासदार संजय दिना पाटील यांनी मुंबई येथे पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याच्या निषेधार्थ वाई तालुका मराठी पत्रकार संघ आणि डिजिटल मीडिया परिषद (वाई तालुका) यांच्या संयुक्त विद्यमाने वाईमध्ये तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या घटनेमुळे तालुक्यातील पत्रकार वर्गात संतापाची लाट उसळली आहे.

खासदार संजय दिना पाटील हे ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. अवघ्या आठ दिवसांपूर्वीच त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला जय महाराष्ट्र करत शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला होता. या राजकीय पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर मुंबईत त्यांना प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांवर ते भडकले आणि



त्यांनी पत्रकारांना थेट जीवे मारण्याची धमकी देत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन दमदाटी केली. या बेजबाबदार कृत्याचे तीव्र पडसाद आता पश्चिम महाराष्ट्रातही उमटू लागले आहेत.

शुक्रवार, दि. २६ जून रोजी सायंकाळी ठीक ६:०० वाजता वाई येथील ऐतिहासिक किसनवीर चौकात तालुक्यातील सर्व पत्रकार एकवटले. या ठिकाणी खासदारांच्या हुकूमशाही प्रवृत्तीचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवण्यात आला. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी कृष्णा पूल मार्गे वाई पोलीस ठाण्यावर थेट धडक मोर्चा काढला.पत्रकारांच्या या हक्काच्या लढ्याला आणि एकजुटीच्या ताकदीला पाहून वाईकर नागरिकांचे लक्ष या मोर्चाने पूर्णपणे वेधून घेतले होते.

| Net | **570.65** | **0.00** | **1.01** | **0.00** | **0.00** | **67.81** | **639.47** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **639.47** |

**a) Movement of Provisions for , Depreciation and Investment Fluctuation Reserve**

(Amount in Rupees Lac)

| Sr.No. | Particulars | 31.03.2026 | 31.03.2025 |
|---|---|---|---|
| i) | Movement of provisions held towards depreciation on investments | | |
| | a) Opening balance | 0.00 | 0.00 |
| | b) Add: Provisions made during the year | 1.15 | 0.00 |
| | c) Less: Write off / write back of excess provisions during the year | 0.00 | 0.00 |
| | d) Closing balance * | 1.15 | 0.00 |
| ii) | Movement of Investment Fluctuation Reserve | | |
| | a) Opening balance | 6.62 | 6.62 |
| | b) Add: amount transfered during the year | 0.00 | 0.00 |
| | c) Less: Drawdown | 0.00 | 0.00 |
| | d) Closing balance | 6.62 | 6.62 |
| iii) | Closing balance in IFR as a percentage of closing balance of investments in AFS and HFT/Current category | 4.41% | 6.62% |
| c | **Sale and transfers to/from HTM category -**<br>The Bank sold any security from HTM Category. | | |
| **d)** | **Non-SLR investment portfolio** | **0.00** | **0.00** |
| **i)** | **Non-performing non-SLR investments** | **0.00** | **0.00** |
| a) | Opening balance | 0.00 | 0.00 |
| b) | Additions during the year since 1st April | 0.00 | 0.00 |
| c) | Reductions during the above period | 0.00 | 0.00 |
| d) | Closing balance | 0.00 | 0.00 |
| e) | Total provisions held | 0.00 | 0.00 |

**ii) Issuer composition of non-SLR investments** (Amount in Lacs)

| Sr. No. | Issuer | Amount | | Extent of Private Placement | | Extent of 'Below Investment Grade' | | Extent of 'Unrated' Securities | | Extent of 'Unlisted' Securities | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | | (4) | | (5) | | (6) | | (7) | |
| | | 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 |
| a) | PSUs | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| b) | FIs | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| c) | Banks | 74.43 | 67.81 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| d) | Private Corporates | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| e) | Subsidiaries / Joint Ventures | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| f) | Others - | | | | | | | | | | |
| | 1.Shares of Satara DCC Bank Ltd | 1.00 | 1.00 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | 2.Shares of M.S.C. Bank Ltd. | 0.01 | 0.01 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | 3.UNITY Bank PNCP Shares | | | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | 4.UNITY Bank Equity Warrants Share | | | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Total | 1.01 | 1.01 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| g) | Provision held towards depreciation | | | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | **Total** | **76.45** | **69.83** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** |

**4 Asset quality -**

**Classification of advances and provisions held on 31.03.2026** ( Amount in Lacs)

| | Standard | Non-Performing | | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total Standard Advances | Sub-standard | Doubtful | Loss | Total Non-Performing Advances | |
| **Gross Standard Advances and NPAs** | | | | | | |
| Opening Balance as on 01.04.2025 | 1694.57 | 106.15 | 56.94 | 0.00 | 163.09 | **1857.66** |
| Add: Additions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 19.16 | **19.16** |
| Less: Reductions during the year* | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 37.34 | **37.34** |
| **Closing balance** | **1661.94** | **23.57** | **121.34** | **0.00** | **144.91** | **1806.85** |
| *Reductions in Gross NPAs due to: | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | | |
| i) Upgradation | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| ii) Recoveries (excluding recoveries from upgraded accounts) | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 37.34 | **37.34** |
| iii) Technical/prudential write off | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| iv) Write-offs other than those under (iii) above | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| | | | | | | |
| **Provisions (excluding Floating Provisions)** | | | | | | |
| Opening balance of provisions held | 7.00 | 15.75 | 101.25 | 0.00 | 117.00 | **124.00** |
| Add: Fresh provisions made during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 28.00 | **28.00** |
| Less: Excess provision Write-off loans | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| Closing balance of provisions held | **8.00** | **15.75** | **121.25** | **0.00** | **145.00** | **153.00** |
| | | | | | | |
| **Net NPAs** | | | | | | |
| Opening Balance | [redacted] | 106.15 | 56.94 | 0.00 | 163.09 | [redacted] |
| Add: Fresh additions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 19.16 | [redacted] |
| Less: Reductions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 37.34 | [redacted] |
| Closing Balance | [redacted] | 23.57 | 121.34 | 0.00 | 144.91 | **144.91** |
| | | | | | | |
| **Floating Provisions** | | | | | | |
| Opening Balance | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Amount drawn down[i] during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Amount drawn down[i] during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Closing balance of floating provisions | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| | | | | | | |
| **Technical write-offs & the recoveries made thereon** | | | | | | |
| Opening balance of Technical/ Prudential written-off accounts | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Add: Technical/ Prudential write-offs during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Recoveries made from previously technical/ prudential written-off accounts during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Closing balance | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | **0.00** |

**Class+B41:H61ification of advances and provisions held on 31.03.2025** ( Amount in Lac)

| | Standard | Non-Performing | | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total Standard Advances | Sub-standard | Doubtful | Loss | Total Non-Performing Advances | |
| **Gross Standard Advances and NPAs** | | | | | | |
| Opening Balance as on 01.04.2024 | 1638.94 | 72.86 | 66.65 | 0.00 | 139.51 | **1778.45** |
| Add: Additions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 77.22 | **77.22** |
| Less: Reductions during the year* | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 53.64 | **53.64** |
| **Closing balance** | 1694.57 | 106.15 | 56.94 | 0.00 | **163.09** | **1857.66** |
| *Reductions in Gross NPAs due to: | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | | |
| i) Upgradation | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| ii) Recoveries (excluding recoveries from upgraded accounts) | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 53.64 | **53.64** |
| iii) Technical/prudential write off | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| iv) Write-offs other than those under (iii) above | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| | | | | | | |
| **Provisions (excluding Floating Provisions)** | | | | | | |
| Opening balance of provisions held | 5.50 | 9.35 | 68.65 | 0.00 | 78.00 | **83.50** |
| Add: Fresh provisions made during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 39.00 | **39.00** |
| Less: Excess provision reversed/ Write-off loans | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| Closing balance of provisions held | 7.00 | 15.75 | 101.25 | 0.00 | 117.00 | **124.00** |


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Net NPAs** | | | | | | |
| Opening Balance | [redacted] | 106.15 | 56.94 | 0.00 | 163.09 | [redacted] |
| Add: Fresh additions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 19.16 | [redacted] |
| Less: Reductions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 37.34 | [redacted] |
| Closing Balance | [redacted] | 23.57 | 121.34 | 0.00 | 144.91 | **144.91** |
| | | | | | | |
| **Floating Provisions** | | | | | | |
| Opening Balance | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Amount drawn down[i] during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Amount drawn down[i] during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Closing balance of floating provisions | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| | | | | | | |
| **Technical write-offs & the recoveries made thereon** | | | | | | |
| Opening balance of Technical/ Prudential written-off accounts | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Add: Technical/ Prudential write-offs during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Recoveries made from previously technical/ prudential written-off accounts during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Closing balance | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | **0.00** |


**Class+B41:H61ification of advances and provisions held on 31.03.2025** ( Amount in Lac)

| | Standard | Non-Performing | | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total Standard Advances | Sub-standard | Doubtful | Loss | Total Non-Performing Advances | |
| **Gross Standard Advances and NPAs** | | | | | | |
| Opening Balance as on 01.04.2024 | 1638.94 | 72.86 | 66.65 | 0.00 | 139.51 | **1778.45** |
| Add: Additions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 77.22 | **77.22** |
| Less: Reductions during the year* | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 53.64 | **53.64** |
| **Closing balance** | 1694.57 | 106.15 | 56.94 | 0.00 | **163.09** | **1857.66** |
| *Reductions in Gross NPAs due to: | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | | |
| i) Upgradation | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| ii) Recoveries (excluding recoveries from upgraded accounts) | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 53.64 | **53.64** |
| iii) Technical/prudential write off | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| iv) Write-offs other than those under (iii) above | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| | | | | | | |
| **Provisions (excluding Floating Provisions)** | | | | | | |
| Opening balance of provisions held | 5.50 | 9.35 | 68.65 | 0.00 | 78.00 | **83.50** |
| Add: Fresh provisions made during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 39.00 | **39.00** |
| Less: Excess provision reversed/ Write-off loans | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 0.00 | **0.00** |
| Closing balance of provisions held | 7.00 | 15.75 | 101.25 | 0.00 | 117.00 | **124.00** |
| | | | | | | |
| **Net NPAs** | | | | | | |
| Opening Balance | [redacted] | 63.51 | -2.00 | 0.00 | 61.51 | [redacted] |
| Add: Fresh additions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 38.22 | [redacted] |
| Less: Reductions during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | 53.64 | [redacted] |
| Closing Balance | [redacted] | 90.40 | -44.31 | 0.00 | 46.09 | **46.09** |
| | | | | | | |
| **Floating Provisions** | | | | | | |
| Opening Balance | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Amount drawn down[i] during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Amount drawn down[i] during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Closing balance of floating provisions | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| | | | | | | |
| **Technical write-offs & the recoveries made thereon** | | | | | | |
| Opening balance of Technical/ Prudential written-off accounts | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Add: Technical/ Prudential write-offs during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Less: Recoveries made from previously technical/ prudential written-off accounts during the year | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | [redacted] | **0.00** |
| Closing balance | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | **0.00** |

| Ratios (in percent) | 31.03.2026 | 31.03.2025 |
|---|---|---|
| Gross NPA to Gross Advances | 8.02% | 8.78% |
| Net NPA to Net Advances | 0.00% | 2.65% |
| Provision coverage ratio (BDDR/Gross NPA) | 100.00% | 71.74% |

**b) Sector-wise Advances and Gross NPAs** ( Amount in Lacs)

| Sr. No. | Sector* | 31.03.2026 | | | 31.03.2025 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Outstanding Total advances | Gross NPAs | Percentage of Gross NPAs to Total Advances in that sector | Outstanding Total advances | Gross NPAs | Percentage of Gross NPAs to Total Advances in that sector |
| **i)** | **Priority Sector** | | | | | | |
| a) | Agriculture and allied activities | 839.46 | 80.24 | 9.56% | 861.42 | 77.21 | 8.96% |
| b) | Advances to industries sector eligible as priority sector lending | 0.00 | 0.00 | 0.00% | | | 0.00% |
| c) | Services | 258.34 | 15.63 | 6.05% | 159.95 | 3.21 | 2.01% |
| d) | Personal loans | 307.56 | 26.97 | 0.00% | 189.17 | 7.89 | 0.00% |
| e) | Housing | 126.05 | 0.00 | 0.00% | 105.56 | 0.00 | 0.00% |
| f) | Other Property | | | 0.00% | | | 0.00% |
| | Subtotal (i) | **1531.41** | **122.84** | 8.02% | **1316.10** | **88.31** | 6.71% |
| | | | | | | | |
| **ii)** | Non-priority Sector | | | | | | |
| a) | Agriculture and allied activities | 170.27 | 15.10 | 8.87% | 436.02 | 42.55 | 9.76% |
| b) | Industry | | | 0.00% | | | 0.00% |
| c) | Services | | | 0.00% | | | 0.00% |
| d) | Personal loans | 104.87 | 6.97 | 6.65% | 105.56 | 32.23 | 0.00% |
| e) | Other Property | | | 0.00% | | | 0.00% |
| | Sub-total (ii) | **275.14** | **22.07** | **8.02%** | **541.58** | **74.78** | **13.81%** |
| | **Total (I + ii)** | **1806.55** | **144.91** | **8.02%** | **1857.68** | **163.09** | **8.78%** |

**d) Particulars of resolution plan and restructuring**

***i) Details of accounts subjected to restructuring*** ***(Amount in Lac)***

| | | Agriculture and allied activities | | Corporates (excluding MSME) | | Micro, Small & Medium Enterprises (MSME) | | Retail (excluding agriculture and MSME) | | Total | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2026 | 2025 | 2026 | 2025 | 2026 | 2025 | 2026 | 2025 | 2026 | 2025 |
| Standard | Number of borrowers | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Gross Amount (₹ Lac) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Provision held (₹ Lac) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| Sub-standard | Number of borrowers | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Gross Amount (₹ Lac) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Provision held (₹ Lac) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| Doubtful | Number of borrowers | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Gross Amount (₹ Lac) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | Provision held (₹ Lac) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| **Total** | **Number of borrowers** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** |
| | **Gross Amount (₹ Lac)** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** |
| | **Provision held (₹ Lac)** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** | **---** |

**e. Diversion in Asset classification and provisioning** **( Amount in Lacs)**

| Sr.No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Gross NPAs as on March 31, 2026 as reported by the bank. | 145.00 |
| 2 | Gross NPAs as on March 31, 2026 as assessed by Reserve Bank of India. | --- |
| 3 | Divergence in Gross NPAs (2-1) | --- |
| 4 | Net NPAs as on March 31, 2026 as reported by the bank | 0.00 |
| 5 | Net NPAs as on March 31, 2026 as assessed by Reserve Bank of India. | --- |
| 6 | Divergence in Net NPAs (5-4) | --- |
| 7 | Provisions for NPAs as on March 31, 2026 as reported by the bank. | 145.00 |
| 8 | Provisions for NPAs as on March 31, 2026 as assessed by Reserve Bank of India. | --- |
| 9 | Divergence in provisioning (8-7) | --- |
| 10 | Reported Profit before Provisions and Contingencies for the year ended March 31, 2026 | 58.00 |
| 11 | Reported Net Profit after Tax (PAT) for the year ended March 31, 2026 | 30.00 |
| 12 | Adjusted (notional) Net Profit after Tax (PAT) for the year ended March 31, 2026 after considering the divergence in provisioning | 30.00 |

# आरफळ कालवा कोरडा....विहिरींनी गाठला तळ...

## पावसाची दडी...पिके जळण्याच्या उंबरठ्यावर : वीजेच्या लपंडावाने शेतकरी संतप्त : पाच तासांत दोन तासांचा फटका

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**मसूर, दि. २७ :** पाण्याअभावी आरफळ कालवा कोरडा पडला आहे. बहुतांश विहिरींनी तळ गाठला आहे.पावसाने दडी मारल्याने पिके जळण्याच्या उंबरठ्यावर आहेत.त्यातच शेतकरी जगला तरच देश जगेल अशा घोषणा केल्या जातात, पण प्रत्यक्षात मसूर परिसरातील शेतकऱ्यांना मूलभूत सुविधा देण्यातही प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. आधीच पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम धोक्यात आला असताना, शेतीपंपांसाठी मिळणारा वीजपुरवठाही अत्यंत अनियमित होत असल्याने हजारो एकरांवरील पिके अक्षरशः मृत्यूच्या दारात उभी आहेत. शासनाकडून पाच तास वीजपुरवठ्याचे आश्वासन दिले जात असले तरी प्रत्यक्षात



**मसूर :** कोरडा ठणठणीत पडलेला आरफळ कालवा.

वारंवार खंडित होणाऱ्या पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला केवळ तीन तासांचीच वीज येत असल्याचा आरोप शेतकऱ्यांमधून होत आहे.

मसूर व परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने भुईमूग, ऊस, भाजीपाला आणि इतर खरीप पिकांची लागवड केली. मात्र पावसाने अचानक पाठ फिरवल्याने सर्व भिस्त विहिरी, बोअरवेल आणि विद्युत पंपांवर आली. त्यातही आरफळ कालव्याला पाणी नसल्याने सिंचनाचा एक महत्त्वाचा स्रोत बंद पडला आहे. परिणामी, वीजपुरवठा हीच शेतीची जीवनरेषा बनली आहे. पण याच जीवनरेषेत सातत्याने अडथळे निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत आहे.

शेतकऱ्यांच्या मते, वीज कधी येईल आणि कधी जाईल याचा कोणताही नेम उरलेला नाही. अनेकदा मध्यरात्री किंवा पहाटेच्या वेळी वीज दिली जाते. शेतकरी जीव धोक्यात घालून शेतात जाऊन मोटार सुरू करतात; पण काही मिनिटांतच पुन्हा वीज खंडित होते. कमी दाबामुळे मोटारी नीट चालत नाहीत, तर वारंवार सुरू-बंद केल्याने विद्युत उपकरणे बिघडण्याचाही धोका वाढला आहे. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम या तिन्हींचा मोठा अपव्यय होत आहे.

दुसरीकडे, जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून पिकांची पाने करपू लागली आहेत. अनेक ठिकाणी रोपे वाळण्यास सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर लाखो रुपये खर्च केले आहेत. मात्र वेळेवर पाणी न मिळाल्यास हा सर्व खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. एका बाजूला निसर्गाची अवकृपा आणि दुसऱ्या बाजूला विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे दुहेरी संकट ओढवले असून शेतकरी अक्षरशः हतबल झाला आहे.

विशेष म्हणजे, शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जात असताना शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना परिसरात तीव्र होत आहे. अनेक शेतकरी संघटना आणि ग्रामस्थांनी याबाबत प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊनही ठोस उपाययोजना होत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. केवळ घोषणांनी पिकांना पाणी मिळत नाही; अखंड व नियोजित वीजपुरवठा आणि कालव्यातून तातडीने पाणी सोडणे आवश्यक आहे, अशी मागणी जोर धरत आहे.

**वीज आणि पाणी मिळणाची मागणी...**

■ परिस्थिती अशीच कायम राहिली तर मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणांवर राहील शेतकऱ्यांनी प्रशासनाला असा इशारा दिला असून महावितरणने अखंड आणि पुरेशा दाबाने वीजपुरवठा करावा, तसेच आरफळ कालव्यात तातडीने पाणी सोडून शेती वाचवावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

**तर प्रचंड नुकसान होईल....**

■ आज मसूर परिसरातील शेतकरी केवळ पावसाचीच वाट पाहत नाहीत, तर विश्वासार्ह वीजपुरवठ्याचीही वाट पाहत आहे. अन्यथा मेहनतीने उभे केलेले पीक डोळ्यांसमोर जळून जाताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणार असून, त्याचे दूरगामी आर्थिक आणि सामाजिक परिणाम संपूर्ण ग्रामीण भागाला भोगावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# एकल महिलांच्या उन्नतीसाठी कराड पंचायत समिती कटिबद्ध : उपसभापती अनिता वेताळ

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**कराड, दि. २७ :** तालुक्यातील एकल महिलांच्या उन्नतीसाठी कराड पंचायत समिती कटिबद्ध असून त्यांना शासकीय योजनेची माहिती देणे, रोजगार व स्वयंरोजगार संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना बचत गटांशी जोडणे यावरती विशेष भर दिला जाणार आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षण करून त्यांच्या समस्यांची नोंद घेत त्यावरती उपाय योजनेसाठी ही पंचायत समिती पाउले उचलणार असल्याचे प्रतिपादन उपसभापती सो.अनिताताई वेताळ यांनी केले.

यशवंतराव चव्हाण सभागृह (बचत भवन) येथे कराड पंचायत समिती, एकात्मिक बालविकास प्रकल्प यांच्यावतीने एकल महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद सदस्य सौ.विजयाताई थोरात, सौ.विद्याताई वेताळ, सौ.सुनंदाताई पाटील, पंचायत समिती सदस्य संग्रामबाबा पवार, सिध्दार्थ चव्हाण, रविंद्र बडेकर, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, ज्ञानदीप संस्था अध्यक्ष आनंदा थोरात, वैद्यकीय अधिकारी डॉ.मैथिली मिरजे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कराड :** एकल महिला दिन कार्यक्रमप्रसंगी अनिताताई वेताळ, संग्राम पवार, सिध्दार्थ चव्हाण, प्रताप पाटील, आनंदा थोरात.

उपसभापती सौ.वेताळ म्हणाल्या, पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रथमच कराड तालुक्यामध्ये ज्ञानदीप सामाजिक संस्थेने एकल महिलांसाठी केलेले संघटन हे प्रेरणादायी आहे. मधुराणी थोरात यांनी एकल महिलांचे प्रश्न आणि त्यासाठी केलेले सेवाकार्य आपण सर्वांनी पुढे नेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्र शासनाने ही याबाबत घेतलेले धोरणात्मक निर्णय हे एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्वपूर्ण आहेत.

आनंदा थोरात म्हणाले, संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेला आंतरराष्ट्रीय विधवा दिवस हा महाराष्ट्रात विधवा या शब्दा ऐवजी अधिक सन्मानजनक एकल महिला असा उल्लेख करत एकल महिला दिवस म्हणून साजरा करण्याचा महाराष्ट्र शासनाचा क्रांतिकारी निर्णय आहे. पतीच्या निधनानंतर महिलांना सहन करावे लागणारे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक कष्ट, भेदभाव तसेच त्यांच्या हक्काबद्दल समाजात जागृती निर्माण करणे हा या दिवसाचा महत्त्वाचा उद्देश आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजश्री शाहू महाराजांच्या विचाराने वाटचाल करताना आपण यापुढे विधवा या नकारात्मक आणि दुःखद शब्दा ऐवजी अधिक आदरयुक्त आणि सन्मानजनक असा एकल महिला हा शब्द अधिकृतपणे वापरण्याचा शासनाचा निर्णय सर्वांनी अंगीकारला पाहिजे. हा निर्णय केवळ शब्दाचा बदल नाही तर समाजाची मानसिकता बदलणारे एका क्रांतिकारी पाऊल आहे. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या प्रत्येक एकल भगिनींना समाजात मानाचे स्थान देऊयात. प्रत्येक सण समारंभात किंवा शुभ कार्यात त्यांना सन्मानाने आमंत्रित करून जुन्या कुप्रथांना कायमची तिलांजने देऊया.

यावेळी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षा निमित्त त्यांनी केलेल्या विविध महिलांसाठी कार्याची माहिती दिली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या सौ.विद्याताई वेताळ, सौ.विजयाताई थोरात, संग्रामबाबा पवार यांनी आपल्या मनोगतामध्ये एकल महिलांचे प्रश्न मांडत समाजातील प्रत्येक महिलेला सन्मानाने जगण्याचा अधिकार असून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनाचे लाभ तळागाळातील प्रत्येक पात्र महिलेपर्यंत पोहोचवला पाहिजे, असे आवाहन केले.

त्याचबरोबर समाजामध्ये त्यांना सन्मान देण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

यावेळी वैशाली पाटील व शितल कुंभार यांनी एकल महिला म्हणून झालेला प्रवास आणि यामध्ये स्वबळावर येणाऱ्या प्रत्येक संकटावरती मात करत ज्ञानदीप संस्थेच्या माध्यमातून आणि मधुराणी थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे वाटचाल कशी केली आणि आज महत्वपूर्ण जबाबदाऱ्या कशा पार पाडतात, याबाबतची यशोगाथा मांडली.

एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी गणेश विभुते यांनी स्वागत केले. सहाय्यक अधिकारी प्रतिभा लोंढे यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले. कार्यक्रमात निवेदिता कांबळे यांनी बालसंगोपन योजना, सविता कुडतरकर यांनी संजय गांधी निराधार योजना, पल्लवी पाटील यांनी घरकुल योजना, विद्या चव्हाण यांनी शिधापत्रिका काढणे व संबंधित कामे, काजल कुंभार यांनी अनाथ प्रमाणपत्र काढणे, आशादेवी चव्हाण यांनी महिला विषयक कायदेविषयक मार्गदर्शन, डॉ.मैथिली मिरजे यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन, कराड तालुका पोलीस ठाणे येथील महिला समुपदेशन केंद्रातील वैष्णवी यादव यांनी महिला समुपदेशन केंद्रातील मदत आदी विषयावरती मार्गदर्शन केले.


# शाहू महाराज हे परिवर्तनाचे शिल्पकार : प्रमोद पवार

## बलवडी (भा.) येथे राजर्षी शाहू महाराज यांची १५२ वी जयंती साजरी

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**विटा, दि. २७ :** शाहू महाराजांनी कला, क्रीडा आणि संस्कृतीलाही तितकेच महत्त्व दिले. संगीत, नाटक, चित्रकला आणि कुस्तीला त्यांनी राजाश्रय दिला. बालगंधर्व, केशवराव भोसले, बाबूराव पेंटर यांसारख्या अनेक प्रतिभांना त्यांनी प्रोत्साहन दिले. समाजाचा विकास केवळ अर्थकारणाने होत नाही; संस्कृती, कला आणि मानवी मूल्ये यांच्यामुळेच राष्ट्र समृद्ध होते, हा त्यांचा व्यापक दृष्टिकोन होता. राजर्षी शाहू महाराज हे परिवर्तनाचे शिल्पकार होत. असे प्रतिपादन उपसरपंच प्रमोद पवार यांनी केले.

बलवडी भा. (ता. खानापूर) ग्रामपंचायत कार्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या १५२ वी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सरपंच शालन कुंभार अध्यक्षस्थानी होत्या.



**बलवडी भा. :** येथील ग्रामपंचायत कार्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करताना शालन कुंभार, प्रमोद पवार, प्रताप जाधव, योगेश नाईक आदी.

श्री. पवार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला त्यांनी दिलेले पाठबळ, मूकनायक या वृत्तपत्राला केलेले साहाय्य आणि दलित समाजाच्या नेतृत्वाबाबत व्यक्त केलेला विश्वास यामुळे भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात शाहू महाराजांचे स्थान अधिक उंचावते. त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाला केंद्रस्थानी ठेवून शासन चालवले. सत्ता ही विशेषाधिकार नसून जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या प्रत्येक निर्णयातून दाखवून दिले.

श्री. जाधव म्हणाले, अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले; परंतु त्यांच्या विचारांचे आयुष्य आजही अखंड सुरू आहे. आधुनिक भारतात समता, सामाजिक न्याय, गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, आरक्षण, सर्वसमावेशक विकास आणि मानवी हक्क यांविषयी जे विचार आपण स्वीकारतो, त्यांची बीजे राजर्षी शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वीच रोवली होती.

श्री. नाईक म्हणाले, आजच्या तरुण पिढीसमोर तंत्रज्ञान, स्पर्धा आणि जागतिक संधींचे नवे क्षितिज खुले झाले आहे. अशा वेळी शाहू महाराजांचा आदर्श आपल्याला सांगतो की, खरे शिक्षण तेच, जे स्वतः ला उन्नत करताना समाजालाही उभारी देते; खरा विकास तोच, जो शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतो; आणि खरे नेतृत्व तेच, जे सत्तेपेक्षा सेवेला मोठे मानते. म्हणूनच राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे केवळ इतिहासातील महान राजा नाहीत, तर भविष्याचा मार्ग दाखवणारे लोकनेते आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे, समतेचा समाज घडवणे आणि शिक्षणातून मानवतेची उभारणी करणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल.

यावेळी सुनिता पवार, जितेंद्र पवार, दीपाली सुर्यवंशी, आशिष पवार, ग्रामपंचायत अधिकारी योगेश नाईक, अमोल पवार, नितीन पवार, मच्छिंद्र सुतार, दत्तात्रय सुर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



**विटा :** छ. शाहू महाराज जयंतीप्रसंगी भाषण करताना विद्यार्थीनी

# छत्रपती शाहू महाराज हे समाज परिवर्तनाचे महामेरू : प्राचार्य खरात

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**विटा, दि. २७ :** समाजातील प्रत्येक सामान्य माणसाला माणूसपण देणारे कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज हे खरे समाज परिवर्तनाचे महामेरू आहेत. ते केवळ राजे नव्हते तर ते खऱ्या अर्थाने दीन दलितांचे बहुजन वंचितांचे कैवारी होते. त्यांनी शिक्षण उद्योग शेती आणि सामाजिक समतेसाठी घेतलेले निर्णय आजही देशाला दिशा देणारे आहेत असे प्रतिपादन आदर्श पब्लिक स्कूल सीबीएसईचे प्राचार्य अवधूत खरात यांनी केले. येथील लोकनेते आदर्श पब्लिक स्कूल सीबीएसई मध्ये लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती अगदी उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शेजल सुर्वे, अमिता पवार, अथर्व पुकळे, शरण्या गायकवाड, स्वरा पवार, यांनी मनोगत व्यक्त केले. रजनी तळेकर यांनी शाहू महाराजांचे जीवन व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. निलेश भोसले, राजश्री चव्हाण, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# कृष्णा कारखान्यामार्फत दर्जेदार ऊसरोपे वितरणास प्रारंभ

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**कराड, दि. २७ :** यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याकडून दर्जेदार ऊस रोपांच्या वितरणास प्रारंभ करण्यात आला. सभासद शेतकऱ्यांना मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांच्या हस्ते ऊस रोपांचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री. सुतार म्हणाले की, कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सभासद शेतकऱ्यांना माफक दरात गुणवत्तापूर्ण रोपे उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना निरोगी ऊस पीक, अधिक उत्पादन, साखर उताऱ्यात सुधारणा तसेच उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होते.

कारखान्यामार्फत दर्जेदार ऊस रोपे वापरल्यास, फुटव्यांची संख्या वाढते, पिकाची वाढ एकसमान राहते आणि उत्पादन क्षमतेत वाढ होण्यास मदत होते. तरी दर्जेदार ऊस रोपांचा लाभ सभासद बंधू भगिनींनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



**शिवनगर :** सभासद शेतकऱ्यांना दर्जेदार ऊस रोपांच्या वितरणाचा प्रारंभ करताना बाजीराव सुतार, अधिकारी व इतर मान्यवर

याप्रसंगी जनरल मॅनेजर (केन) दादासाहेब शेळके, ऊस विकास अधिकारी पंकज पाटील, सेक्रेटरी सिद्धेश्वर शीलवंत, सहाय्यक शेती अधिकारी अजय दुपटे, सहाय्यक ऊस विकास अधिकारी शिवाजी बाबर, सभासद शेतकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पाटण नगरपंचायतीकरीता ०५ कोटींचा निधी मंजूर

## पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांच्या पाठपुराव्याला यश

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**पाटण, दि. २७ :** पाटण या तालुक्याच्या ठिकाणी नगरपंचायतीच्या क्षेत्रामध्ये आवश्यक असणाऱ्या विकास कामांना महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून तातडीने निधी मंजूर होणेकरीता महाराष्ट्र राज्याचे पर्यटन,खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री ना.शंभूराज देसाई यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांचेकडे ०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याकरीता सातत्याने पाठपुरावा केला होता.मंत्री ना. शंभूराज देसाई यांनी केलेल्या शिफारशीनुसार पाटण नगरपंचायतीचे क्षेत्रामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या विविध विकास कामांना ०५ कोटी रुपयांचा निधी वितरित केला असल्याचा शासन निर्णय राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने पारीत केला असल्याची माहिती ना.शंभूराज देसाई यांचे कार्यालयाचे वतीने प्रसिध्दीपत्रकांत देण्यात आली आहे.

प्रसिध्दीपत्रकांत पुढे म्हंटले आहे की, पाटण नगरपंचायतीचे क्षेत्रामध्ये नागरी सुविधांची अनेक कामे गेली अनेक वर्ष प्रलंबित असल्याने येथील नागरीकांची मोठी गैरसोय होत होती. तसेच पाटण शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने सदरची नागरी सुविधांची कामे मंजूर होण्यासाठी मंत्री ना. शंभूराज देसाई यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे यांचेकडे शिफारस केली होती. ना.शंभूराज देसाई यांनी केलेल्या शिफारशीनुसार पाटण नगरपंचायतीचे क्षेत्रामध्ये नागरी सुविधांचे विविध विकास कामासाठी राज्याचे नगरविकास विभागाने ०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचा शासन निर्णय पारित केला आहे. या शासन निर्णयानुसार पाटण नगरपंचायती अंतर्गत पुढीलप्रमाणे असणाऱ्या विविध विकास कामांना निधी मंजूर करण्यात आला आहे.यामध्ये पाटण नगरपंचायत



प्रभाग क्र.१४ स्मशानभूमी बांधणे व सुशोभिकरण ३५ लक्ष, प्रभाग क्र. ११ एस.टी.कॉलनीमध्ये सभामंडप २५ लक्ष, प्रभाग क्र. ११ जालिंदर देवकांत यांचे घरापासून नंदकुमार देवकांत यांचे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक १० लक्ष, प्रभाग क्र. ०९ लायब्ररी चौक ते चाफोली रोड रस्ता सुधारणा व गटर बांधकाम ३० लक्ष, प्रभाग क्र. १७ लोहार यांच्या मळीमध्ये पायऱ्या १५ लक्ष, प्रभाग क्र.०६ बाजार समिती मैदान मजबुतीकरण सुशोभिकरण २० लक्ष, प्रभाग क. ०५ व ०६ आर.सी.सी.गटर १० लक्ष, प्रभाग क्र.१३ नागोबा मंदिर नगर पंचायत जागेमध्ये सभामंडप २५ लक्ष, प्रभाग क्र.१५ भास्कर कुंभार यांचे घर ते कराड चिपळूण रोड आर. सी. सी. बंदिस्त गटर २० लक्ष, प्रभाग क्र.१५ एल.एम.पवार यांचे घरापासून आनंदा आर्डे यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक व बंदिस्त आर.सी.सी.गटर १० लक्ष, प्रभाग क्र.०६ बाजार समिती कमान १५ लक्ष, प्रभाग क्र.१६ साळुंखे हायस्कुल ते संतोष नाईकवडी यांचे घर व श्री. ठोके यांचे घर ते सुरेश नायकवडी यांचे घररस्ता कॉंक्रीटीकरण व बंदीस्त गटर बांधकाम ३५ लक्ष, प्रभाग क्र.०८ चंद्रकांत भिसे यांचे घरापासून आनंदा शिरसाठ यांच्या घरापर्यंत रस्ता व गटर २० लक्ष, प्रभाग क्र. १५ गणपती मंदिर सुशोभिकरण १५ लक्ष, प्रभाग क्र.११ सर्जेराव चव्हाण यांचे घर ते प्रकाश पाटील यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण १५ लक्ष, मुस्लिम स्मशानभूमी कपौंड २५ लक्ष, इदगाह परिसर सुशोभिकरण २५ लक्ष, प्रभाग क्र. १७ भुई समाजाकरीता समाज मंदिर २५ लक्ष, प्रभाग क्र. ०६ बाजार समिती परिसरामध्ये शौचालय २५ लक्ष, प्रभाग क्र. १४ कराड चिपळूण रोड ते मुळगांव पुल रस्ता सुधारणा ५५ लक्ष, प्रभाग क्र. १७ शफिभाई सातारकर यांचे घरापासून लोहार यांचे शेतापर्यंत आर्.सी. सी. गटर १५ लक्ष, प्रभाग क्र.१३ श्री. देसाई ते डॉ. सावंत यांचे घर ते श्री. नाना इंगळे ते बापू टोळे यांचघर रस्ता जिरवूण कॉंक्रीटीकरण २० लक्ष, प्रभाग क्र.०८ सेवागिरी महाराज मंदीरासमोर सभामंडप १० लक्ष असा एकूण ०५ कोटींचा निधी नगरविकास विभागाकडून मंजूर करण्यात आला आहे..राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी पाटण नगरपंचायतीच्या क्षेत्रामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या कामांना भरघोस निधी मंजूर केल्याबद्दल ना.शंभूराज देसाई यांनी आभार मानले. लवकरच या मंजूर कामांची निविदा प्रक्रीया होऊन तातडीने हि कामे मार्गी लागणार असल्याचे शेवटी पत्रकात म्हटले आहे.

Daily Muktagiri published by printer, publisher, owner and editor Anil Shivajirao Desai printed at Muktagiri Press, 455/2/17, Sadarbazar, Satara and published at Shivsampada, 46, Mutha Colony, Sadarbazar, Satara. RNI Regd No. 69769/98